म. ग्रं. सं. ठाणे
विषय वैद्यक
सं. क्र. ९२

॥ श्री ॥

# बाभळीचा उपयोग.

लेखक व प्रकाशक

प्रभाकर बाळाजी ओगले

( चिकित्सा-प्रभाकर, सुलभौषधी प्रभाकर,
निंबप्रभाव, तुलसीप्रताप व
बिल्वमहत्त्व कर्ते )

मुकाम ओगलेवाडी
सं. औंध, जि. सातारा.

REFBK-0004775

शके १८५४

किंमत २ आणे.

॥ श्री ॥

# बाभळीचा उपयोग.

लेखक व प्रकाशक

प्रभाकर बाळाजी ओगले

( चिकित्सा-प्रभाकर, सुलभौषधी प्रभाकर,
निंबप्रभाव, तुलसीप्रताप व
बिल्वमहत्त्व कर्ते )

मुक्काम ओगलेवाडी

पो. औंध, जि. सातारा.

दा. क्र. ४०५५

मुद्रक
शंकर नरहर जोशी,
मॅनेजर चित्रशाळा प्रेस

शके १८५४

REFBK-0004775

किंमत ३ आणे.

# प्रस्तावना.

कांट्यांनीं भरलें शरीर अवघें, छाया नसे दाटही ।
नाहीं वास फुलांस भूक न निवे ज्यांच्या फळें अल्पही ॥
नाहीं एकही पांथ येत जवळी तुझ्या असो गोष्टिही ।
अन्याचीं न फळें मिळोत म्हणुनि होशी तयातें वई ॥१॥

वरील श्लोकांत अन्योक्तिकाराचें म्हणणें अगदीं खरें असलें तरी बाभळीच्या झाडांबद्दल दुसऱ्या बाजूनें विचार करूं लागल्यास इतर व्यवहारिक उपयोग व आरोग्यासंबंधी औषधी उपयोग या झाडाचें अंगीं फार महत्त्वाचे आहेत, असेंच आढळून येईल. करितां मी बाभळीच्या जाती व त्यांच्या गुणांबद्दल अनेक संस्कृत व मराठी वैद्यक, व इतर पुस्तकें यांचें आधारें हें पुस्तक लिहिण्याचें कारण असें कीं, हीं बाभळीचीं झाडें सर्वत्र लावण केल्यावांचून आपोआप उगवतात व व्यवहारिक व औषधी उपयोग फार महत्त्वाचे होतात, हें पुढील लेखांत दाखविलें आहे. याचा उपयोग प्रत्येक खेड्यांतील गृहस्थाचें कुटुंबांत व वैद्य व डॉक्टर व शाळामास्तरांस फुकट पण फारच महत्त्वाचा होईल.

पौष शु॥ १ शके १८५४
ओगलेवाडी जि. सातारा. सं. औंध.

प्रभाकर बाळाजी ओगले.

# बाभळीचा उपयोग.

ग्रंथ संग्रहालय
क्र. ८०५५

## बाभुळीचीं नांवें

( सं. ) बब्बुल, बर्बुर सपीतक, मेदिना, आभाषट्पद किंकिराट ( हिं. ) बाबुल, कीकिर, बाबूर ( बं. ) बाबूल, बाबूलगाछ. ( गु. ) बावळ. ( का. ) करेजालि. ( तामिल. ) करुवेल ( तेलंगी नल्लुतुम्भ. ( मलाई ) करुवेलम ( कोंकणी ) रामीस्कुल ( इं. ) Acacia arabica ( अकेसिआ अरेबिका. )

## गुणधर्म.

१ बाभूळ ही ग्राही असून, कफ, कोड, कृमी, विष, प्रमेह, अतिक्षीणत्वनाशक आहे.

२ कडू मधूर, स्निग्ध, शीत, तुरट, उष्ण असून आमरक्तातिसार-नाशक, ग्राहक आहे; व कफ, खोकला, दाह, वात, पुंस्त्व, प्रमेह, अर्शनाशक आहे. बाभूळीचे सर्वांग व डिंक हीं संग्राहक आहेत.

## बाभुळीच्या झाडांच्या जाती.

( १ ) कांटेबाभूळ ( २ ) निकांटेबाभूळ, ( ३ ) देवबाभूळ, ( ४ ) रानबाभूळ, ( ५ ) संतबाभूळ, ( ६ ) गुआबाभूळ

( १ ) कांटेबाभूळी सुकट व काळ्या जमिनींत सर्वत्र होतात. त्यांचें सर्व अंग कांट्यांनीं भरलेलें असतें. या झाडांचीं पानें चिंचेच्या झाडाच्या पानांसारखीं लांबट पण बारीक असतात; व पांचसात वर्षांचें झाड झाल्यावर पिवळ्या रंगाचीं गेंददार फुलें येतात. शेंगा लांबट असून चापट असतात. करंगळीएवढया रुंद असतात. एका शेंगेंत पांच ते आठ बिया असतात. त्यास 'धामुके' म्हणतात. ह्या शेंगा शेळ्या, मेंढया बोकड यांस फार आवडतात व

त्या सबंध बियांसह खातात. झाड फार उंच असल्यामुळें धनगर-लोक काठीनें शेंगा पाडून चारतात.

( २ ) निकांटेबाभूळ (गोडीबाभूळ ) हाही वृक्ष कांटेबाभूळीसारखाच वृक्ष मोठा असतो, पण यास कांटे नसून पानांस तुरटपणा कमी असतो. इतर सर्व आकार, पानें, फुलें, कांटे, बाभूळीच्या झाडांसारखींच असतात. ह्यांचाही पाला, शेंगा वगैरे शेळ्या-मेंढयांस आवडतात.

( ३ ) देवबाभूळ हीं झाडें एकदोन पुरुष उंच असतात व पानें वगैरे मोठया बाभुळीप्रमाणेंच असतात. पण फुलें मोठया बाभूळीच्या फुलांसारखीं असलीं तरी तीं सुवासिक असतात; व तीं देवास वाहतात. शेंगा बांकदार व जाड असतात व आंखूड असतात. हीं झाडें विजापूर जिल्ह्यांत, धारवाड वगैरे कर्नाटकभागांत काळ्या व डोंगरी जमिनींत पुष्कळ असतात. देवबाभूळीचीं नांवें:—( सं. ) मेदिना, सपीतक, आभा, पीतपुष्पक, किंकिराट ( म. ) कोकई, कासेबाभूळ, कंकरी. ( गु. ) रानबाभूळ. गुणः—कडू, तुरट, ग्राहक, भेदक, रक्तदोष, ज्वर, शोष, वांति, मोह, कृमि, कुष्ट, विष, उष्ण असून, पित्तदाह, कफवात, नाशक आहे.

( ४ ) रानबाभुळी कर्नाटकांतील जंगलांत पुष्कळ आहेत व हीं झाडें दोनतीन पुरुष उंच असून वरील बाजूस डेरेदार पसरट असतात. यांचीं झुडुपें असतात. फुलें व फळें, इतर बाभुळीसारखींच असतात पण त्यांत किंचित् फरक असतो. देवबाभूळीसारखींच पानें व फुलें असतात व कांटे मोठे व लांब असून ठोंसर असतात. रानबाभूळीचीं झाडें कुंपाच्या फारच उपयोगीं आहेत.

( ५ ) आणखी संत या नांवाची जात आहे तीपासून तिच्या शेंगा उकडून 'आकाकिया' नांवाचा सार काढितात. तो मुंबईत

मुसलमान व पसाऱ्याचे दुकानांत मिळतो. तो अरबस्तानांतून व तुर्कस्तानांतून इकडे येतो. हा जड, सुगंधी, काळा व कठिण असतो. परंतु उजेडांत धरल्यास हिरवटतांबूस रंगाची झांक मारते. रुचीनें गोड, बुळबुळीत, तुरट असून पाण्यांत विरघळतो; व इसबगोल किंवा आळिवासारखा बोळकट होतो.

आकाकियाचे गुणः— शीतळ, शुष्क, ग्राही, रक्तसंग्राहक व बल्य आहे.

( ६ ) गुआबाभूळ ( सं.) आदिमेय, ( हिं. ) गंधबाभूळ, ( बं. ) गुनाबाबला. ( कों. ) कुसरीझाड, कासेबाभूळ, कंकी. ( का. ) किरीजाली. ( ता. ) पिक्करूवेल. ( तु. ) करिवेलम्.

मदनपालनिघंटूंतील नांवें:—बबूल, किंकीराल, पीतक, पीतपुष्पक, लघुबाभूळ, ( जालबबुलक ) गुणः—तुरट, उष्ण, पित्त, दाह, उष्णवातनाशक आहे.

## उपयोग.

बाभळीचे कांटे अणकुचीदार व ठोंसर असलेमुळें त्यांचा शेतकऱ्यांस व बागाईतदारांस शेताच्या व बागेच्या संरक्षणांस कुंपास फार मोठा उपयोग होतो. साली व शेंगा कातडीं कमावण्याच्या व रंगविण्यास उपयोगीं करण्याची कला सर्व हिंदुस्थानचे ढोरलोकांस व चर्मकारांस फार प्राचीन काळापासून माहीत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत बाभळीचीं झाडें तोडून दीडदोन हाताचे तुकडे करून ओलेपणींच साल काढून कशाच्या तरी आधारानें साली उभ्या करून ठेवून वाळल्यावर विकतात.

सर्वप्रकारच्या बाभळींचा रोग निवारण्यासंबंधीं औषधाकडे कसा उपयोग करावा हें पुढें सांगतों:—

## उत्पत्ति.

हीं झाडें देशावर सर्वत्र काळ्या जमीनींत होतात. ह्या झाडांस पाणथळ जमिनीपेक्षां कोरडी काळी जमीन फार मानवते. तांबडे मातीच्या जमिनींत हीं झाडें क्वचितच होतात. कोंकणांत हीं झाडें काळसर जमिनींतच होतात. महाराष्ट्र व कर्नाटकांतील सर्व जिल्हा-निहाय व म्हैसूर, बळारी, रायचूर वगैरे भागांतही हीं बाभळीचीं झाडें होतात. त्याचप्रमाणें कांटे असणारीं बाभळीचीं रानझुडपेंही वरील सर्व प्रदेशांत होतात.

**गुआबाभूळः**—हें झुडूप देशभागांत व सिंधप्रांतांत काळ्या व रेताड जमिनींत होतें. शेंगा ताठ, आंखूड पण त्यांत मगज जास्त असतो व बिया दोन रांगांनीं असतात. सर्व तऱ्हेच्या बाभळीचीं पानें बहुतेक सारखींच असतात व तीं चिंचेच्या पानांसारखींच परंतु बारीक असतात. हीं झाडें बीं पडून आपोआप होत नाहींत. कारण ह्यांच्या बियांचें कवच जाड असतें, त्यामुळें शेळ्यामेंढ्यांच्या व बकऱ्यांच्या त्या खाण्यांत येऊन सबंध बिया लेंड्यांतून जशाच्या तशाच पडतात. त्या बियांचे टरफलास शेळ्यामेंढ्या वगैरेंच्या आंतड्यांतून मऊपणा आल्यामुळें त्या योग्यवेळीं पावसाळ्यांत आपो-आप उगवतात व त्यांचीं रोपडीं आपोआपच वाढतात व मोठीं होऊन फलद्रूपही होतात. असें असलें तरी आपणांस बियांपासून झाडें करणें झाल्यास ऊन पाण्यांत बारा-पंधरा तास भिजत घालून मग पेरणी केल्यास पाण्याच्या ओलीनें मऊपणा येऊन उगवून वाढतात.

### बाभळीच्या झाडाच्या अंगप्रत्यंगांचा विचारः—

**१ पानेंः**—पानें हीं सर्वतऱ्हेच्या बाभळीचीं आकारानें व गुणानें बहुतेक सारखींच असून औषधांच्या कामीं बराच उपयोग होतो.

**बाभळीचे पानाचे गुण**:—ग्राहक, तिखट, उष्ण असून खोकला, वायु, पूंस्त्व*, कफ, अर्श यांचा नाश करतात.

२ **फुलें**:—सर्व तऱ्हेच्या बाभळीच्या झाडांनां पिंवळ्या रंगाचीं फुलें येत असून तीं वाटोळीं व गेंददार असतात; म्हणून त्यास पीतपूष्पी असें म्हटलें आहे.

## शेंगा.

३ **शेंगा**:—बाभळीच्या शेंगा ४ ते ८ बोटें लांब असून पेरेदार व बोटभर रुंद असतात. गरीब लोक कोंवळ्या शेंगांचें लोणचें व भाजी करतात. कातडीं कमाविण्यास व रंगविण्यासही शेंगांचा उपयोग होतो. शेंगांचा रंग चांगला होतो व सालीबरोबर शेंगांची पूड वापरल्यास कातडें नरम होऊन रंगही उत्तम बसतो. शेंगाची पूड तीन भाग व हिराकस एक भाग घालून शाई केल्यास पक्की व काळी होते. कच्च्या शेंगा शेळ्यामेंढयांस व बकऱ्यांस फारच आवडतात. म्हणून धनगरलोक त्या काठीनें झाडावरून पाडून चारतात, हें आपण नेहमीं पाहतोंच. शेंगांचा अर्क कांहीं रोगांवर फारच चांगला उपयोगी पडतो.

## साल.

**मोठ्या बाभळीच्या साली**—रंगांत व कातडीं कमावण्याच्या व रंगविण्याच्या व कापडास पक्का रंग देण्याच्या कामीं फारच उपयोग होतो. पण झाड सहासात वर्षांचें व्हावें लागतें. जितकें जुनें झाड होतें तितकें चांगलें. सालीमध्यें गॅलिक व टॅनिक ॲसिड ( रांपट द्रव्य ) असून रंगीत द्रव्यही असतें. यामुळें कातडीं कमाविण्याचें कामीं फारच उपयोग होतो ओलेपणांत कातडींतील ( अलिबओमीन )

* पूंस्त्वनाशक ( पुरुषत्वनाशक )–पुष्कळ दिवस सतत खाण्यांत आल्यास हा अनुभव येतो. केवळ औषधाकरितां खाण्यास हरकत नाहीं.

व ( जिलेटिन् ) प्राणिजद्रव्यें लवकर कुजून नाश पावतात, परंतु तींच कातडीं सालींतील ॲसिडामुळें पाण्यांत अविद्राव्य होऊन कच्चें कातडें मजबूत व टिकाऊ होतें. बाभळीच्या शेंगांतील बीं व साल यांचेहि निरनिराळे रंग होतात. बियांत लाल रंगाचें प्राधान्य असतें. कापडास तांबडा रंग देण्यास बियांचा उपयोग करितात. बाभळीचें झाड जून झालें म्हणजे वर लिहिलेप्रमाणें सर्व उपयोगांत आणतात. बाभळीच्या झाडाच्या सालीचे दोन उपयोग होतात. ( १ ) त्यानें कातडीं मऊ पडतात. व ( २ ) त्यानें कातडीवर रंग चढतो.

## कांटे.

कांटेरी मोठ्या बाभळीचे मोठे टहाळे व रानबाभळीच्या झुडपाचे कांटेरी टहाळे यांचा बागेच्या व शेताच्या संरक्षणाकडे कुंपणास मोठा उपयोग होतो. डहाळे तोडल्यामुळें तीं झाडें कमजोर न होतां जास्तच वाढीस लागतात.

## डिंक.

**नांवें:**—( म. ) बाभळीचा डिंक. ( गु. ) बाभळनो गुंदर. ( सं. ) बब्बूळ. ( हिं. ) बब्बुल कीकर ( इं. ) गम अकेशिया, Acaciae gummi, अनेकप्रकारच्या झाडांपासून म्हणजे धावडा, पळस, शेवगा, सावरी, खैर इत्यादि झाडांपासून डिंक उत्पन्न होतो व बाजारांतही विकत मिळतो. पण बाभळीच्या झाडांच्या डिंकांत जे गुण आढळून येतात ते इतरांत नाहींत. म्हणजे चिकटपणा, गोडी, पौष्टिकपणा, थंडपणा, झिलई, वगैरे गुण इतर झाडांचे डिंकाहूनही उत्तम व अधिक आहेत. बाभळीच्या झाडाचा डिंक पांढरा असतो व फार दिवस राहिल्यास तांबूस रंगाचा होतो. हा झाडाच्या खाचेंत स्वाभाविकपणें होतो व मुद्दाम खांचा पाडल्यास त्यांतही झाडाच्या रसापासून उत्पन्न होतो. हा प्रथम पातळ असून हवा लागून घट्ट होतो.

हा डिंक खोकला, अतिसार, मूत्रदाह, धातुक्षय, क्षय ह्यांचा नाशक आहे. चिन्यागोंद ( सं. ) बरबर ( म. ) चिन्यागोंद ( गु. ) हिरादखण, ( हिं. ) हिरालुकी ( इं. ) कायनोराय.

ह्याचीं झाडें मलबार प्रांतांत होतात. ह्या झाडाचा डिंक ग्राही, स्तंभक, आहे. हा तांबडा असून अपारदर्शक असतो, व माणका-सारखा चकाकतो.

डिंकाचा कागद वगैरे चिकटविण्याचें कामीं व इतर रंगांस जिल्हई देण्याचे कामीं तर उपयोग होतोच पण याहीपेक्षां औषधाचे कामीं व खाद्य पदार्थाचे कामीं कसा उपयोग होतो हें त्या त्या योग्य ठिकाणीं पुढें विस्तारानें लिहिलें आहे, तें पहावें. बाभळीच्या झाडाच्या खाचेंतून रस वहातो तोच हवेनें घट्ट बनून डिंक तयार होतो. अरबस्तानांतून येणारा डिंक तेथें बाभळीच्या झाडासारखीं हुबेहुब झाडें आहेत त्यापासून काढतात. त्यास मस्वाई गोंद म्हणतात व तो एडनबंदरांतून मुंबईस येतो. प्रत्येक मोठ्या झाडापासून दरसाल अदमासें एकशेर किंवा दीडशेर डिंक निघतो व झाड जुनें होईल तसतसा जास्त डिंक निघतो. एरंडेलाचा वाईट वास घालविण्या-करितां त्यांत बाभळीच्या झाडाच्या डिंकाचें पाणी मिसळावें म्हणजे त्याचा वास जाऊन त्याचा औषधांत फार उपयोग होतो. पर-देशाहून येणारी पेपरमींटगोळ्या वगैरे मिठाईत डिंकाचाच भाग असतो. बाभळीचा डिंक हा फार पौष्टिक आहे. बाभळीचे डिंकासच ' मोरोक्कोगम् ' 'बार्बरी गम्' वगैरे रंगीत लेबलें लावून महाग विकतात. इतर कोणत्याही डिंकांत बाभळीच्या डिंकाइतका चिकटपणा असत नाहीं.

# व्यापारी उपयोग.

## लाकूड.

बाभळीचें लाकूड कणखर असून मजबूत आहे. शेतकीचीं आउतें बहुतकरून बाभळीच्या लाकडाचींच असतात. उसाचा रस काढण्याचे घाणे पूर्वीपासून हिंदुस्थानांत बाभळीच्या जुन्या लाकडाचेच करीत असत. अलीकडे बिडाचे घाणे इकडे निघाल्यापासून बाभळीच्या लाकडाचे कमी होऊं लागले आहेत. तरीपण खेडेगांवांत पुष्कळ पहाण्यास मिळतात. हे घाणे दरसाल उसाचे गुऱ्हाळ झालें म्हणजे विहिरींतील पाण्यांत बुडवून ठेवितात. असें केल्यानें तें ४।५ वर्षें उपयोगीं पडतात. बाभळीच्या लाकडांस कीड किंवा वाळवी लागत नाहीं. इमारतीस तुळया, जंत्या, खुंट्या, वासे बाभळीचेच घालतात. बाभळीचें लाकूड कणखर व टिकाऊ असल्यामुळें कुऱ्हाडीचे दांडे, गाडीचीं चाकें, धनगराचे कांबळी विणण्याचे धोटे, याचींच करतात. एकंदरींत मजबुती व टिकाऊपणाचें कामीं जेथें हवें असेल तेथें बाभळीच्याच लाकडाचा उपयोग करावा लागतो.

## कोळसा.

बाभळीच्या जुनाट झाडाच्या लाकडाचे दीडदोन हाताचें खंडके करून साल काढून आंतील लाकूड वेगळें करून त्याचे साधारण मानानें वीत किंवा दीड वीत व्यासाचे उभे चिरून तुकडे करून माळजमिनींत किंवा शेतांत लाकडाचे अजमासानें खळगे खणून त्यांत खंडके उभे जुळवून ठेवून त्यावर गवत, पाचोळा व काटक्यांचा थर घालून जाळ लावतात. आंतील लाकडें चांगलीं पेटलीं म्हणजे वारा आंत जाऊं नये म्हणून व लाकडांतील कॉर्बन वायूचा अंश जळून जाऊं नये म्हणून खळग्यावर माती पसरून घालतात.

मातीच्या आच्छादनास बारीक भोकें असल्यानें खळग्यांतील धूर बाहेर जातोच. लाकडांची रास लहानमोठी असेल त्यामानानें धुमसत जळण्याची क्रिया कमीजास्त दिवस चालून कोळसे तयार होतात. असें न करतां उघड्या हवेंत लाकडें जाळल्यास कोळसे न मिळतां सर्वच राख होते. पाणी शुद्ध करणेचा फिल्टर तयार करणें झाल्यास त्याकरितां कोळसे तयार करणें झाल्यास एक मातीची किंवा लोखंडी पत्र्याची घागर घेऊन तींत लाकडाचे तुकडे भरून तोंडावर परळ किंवा पत्र्याचें भोंक असलेलें झांकण मातकापडानें घट्ट बसवावें नंतर ती घागर विस्तवाचें भट्टींत ठेवून खालीं आंच द्यावी. म्हणजे वरील भोंकातून कोळशांतून उडणारीं द्रव्यें उडून जातात व शुद्ध कार्बनच मागें राहतो. वरील भोंकांतून धूर जाणें तो बंद झाला म्हणजे घागर भट्टींतून बाहेर काढून चांगली निवून गार झाली म्हणजे कोळसे काढून घेऊन त्यांचा फिल्टरकडे उपयोग करावा; किंवा जरूरी प्रमाणें आणखीही एकादें पातळ द्रव्य शुद्ध करून घ्यावें. लाकडी कोळसा हलका, काळा, सच्छिद्र व अविनाशी असा घन पदार्थ आहे व ठिसूळ असल्यामुळें त्याची भरड पूड होते. पण या पुडीचे अंश कांहीं पाण्यांत तसेंच तीक्ष्ण आसिडांतहि विरघळत नाहींत व उष्णतेनेंही त्यांचा रस होत नाहीं. कोळसा फार मंदवाहक आहे. तो एकींकडे लाल तापला तरी त्याच्या जवळच एका बोटाच्या अंतरानें त्याला धारितां येतें. कोळसा जळतांना धूर निघत नाहीं व आंचही कडक असते. म्हणून लोखंडी काम करणारे घिसाडी व लोहार, तांबट, कल्हईवाले, सोनार व इतर भट्या लावून काम करणारे लोक कोळशांचा उपयोग करितात. तेही बाभळीचाच कोळसा पसंत करितात, दुर्गंधीचा नाश करण्यासही कोळशांचाच उपयोग होतो. पण त्यास कोणत्याही जातीच्या लाकडांचा कोळसा चालतो.

## धर्म.

मोठ्या बाभळीची साल फारच संग्राहक आहे. डिंक, स्नेहन, ग्राही, पौष्टिक व पाचक आहे. संतनामक झाडाची साल (अकाकिया) शुष्क, थंड, ग्राही, संग्राहक व बळ देणारी आहे. देवबाभळ विषनाशक आहे. देवबाभळीच्या झाडावर लाखेचे किडे रांगेनें वाळवीप्रमाणें घरें करितात. त्यांपासून लाखही उत्पन्न करितां येईल. मोठ्या बाभळीप्रमाणेंच त्यास कांटे असून शेंगा व पिंवळीं फुलें येतात. देवबाभळ तुरट, कडु, शीतळ, आहे व उष्ण, कफ, पित्त, तृषा, रक्तदोष, दाह, ज्वर, वांति, मोह, विष यांचा नाश करिते.

## रसशास्त्र.

बाभळीच्या शेंगांमध्यें बावीस २२ टक्के कषायद्रव्यें आहेत. सालींत खारट व आंबट क्षार आहेत. दारू गाळण्यापूर्वीं ताडींत साल घालतात. असें केल्यानें ताडींतील मांसल पदार्थ तळांत बसतात व वरती निवळ ताडी रहाते. मांसल पदार्थ ताडींत राहिल्यास गाळतांना दुर्गंधि येते.

---

पुढें ह्या सर्व प्रकारच्या बाभळीच्या झाडांचा मनुष्यांचे रोगनिवारणार्थ औषधींच्या कामीं कसा उपयोग करावा तें खुलासेवार स्पष्टपणें लिहून दाखविलें आहे.

## अतिसार.

१ गोड्या बाभळीच्या (कांटे नसलेल्या) थोर बाभळीच्या पानांचा रस काढून वयमानाप्रमाणें १ ते ३ तोळे घेऊन थोडी साखर घालून प्यावा. सकाळसंध्याकाळ. दि. ३ ते ५ पथ्य ताकभात. यानें अतिसार, रक्तातिसार, त्रिदोषादि हीं जातात.

ग्र. क्र. ४७५५



२ बाभळीच्या झाडाच्या सालीचा रस वयमानाप्रमाणें १ पासून ३ तोळे घेऊन त्यांत साईचें दहीं घालून द्यावा. रक्ताचा व साधा अतिसार रहातो.

३ बाभळीचा कोंवळा पाला वांटून दह्यांतून द्यावा. दि. ३।७ रोज २ वेळ. अतिसार सहज जातो.

४ कीकर ( खुरट्या ) जातीच्या बाभळीचीं पानें पाण्यांत वांटून वयमानाप्रमाणें १ ते ५ तोळे प्याल्यास अतिसाराचें नांवही रहात नाहीं. दि. ३।५।७ सकाळसंध्याकाळ.

५ **सर्वातिसारास**—मोठ्या बाभळीच्या पानांचा रस किंवा कुड्याच्या सालीचा रस किंवा अष्टमांश काढा प्याल्यानें सर्वप्रकारचे अतिसारही नष्ट होतात.

६ **कफातिसारास**—बाभळीचीं पानें, जिरें, शाजिरें, यांचें चूर्ण १। तोळा घेऊन ऊन पाण्यांत खावें दि. ३।७ कफातिसार जातो.

७ **अतिसार व मोडशीस व वांतीस**—डिंक ३ भाग, अफू $\frac{1}{4}$ भाग, दालचिनी ३ भाग ह्यांचीं चूर्णें मिसळून मधांतून दरवेळीं ५ पासून १२ गुंजापर्यंत २।२ तासांनीं खावें. हटकून राहते.

८ अतिसारांत गुदभंग ( अंग बाहेर येणें ) झाल्यास किंवा गुदपाक झाल्यास बाभळीचा कोवळा पाला व कापूर खलून गुदावर बसवून बंधन करावें.

## अस्थिभंग ( हाड मोडणें ).

१ बाभळीच्या बियांचें चूर्ण मधांतून वयमानाप्रमाणें अर्धतोळापासून १॥ किंवा २ तोळेपर्यंत खावें. दि. ३ ते ७ सकाळसंध्याकाळ. यानें हाडें पूर्वीसारखीं बळकट होतात.

२ **सांध्यांतील अस्थी मोडल्यास**—बाभळीचें बीं १ भाग, त्रिफळा ( हिरडा, बेहडा, आवळकाठी ) १ भाग, त्रिकटु ( सुंठ,

मिरे, पिंपळी ) १ भाग, गुग्गुळ सर्वांसमान म्हणजे ३ भाग, सर्व एकत्र करून वयमानाप्रमाणें १ पासून ३ तोळे घेऊन मधांतून खावें. सकाळसंध्याकाळ. दि. ३।७।१० उत्तम आहे. पथ्य–रोटी तूप मीठ वर्ज्य.

३ **आभागुग्गुळ**—बाभळीची साल, त्रिफळा, त्रिकटु सर्वांचें चूर्ण त्यासमान गुग्गुळ घालून त्याच्या गोळ्या १ तोळ्यांच्या करून सकाळसंध्याकाळ घेतल्यास सांधे जुळून येतात. दि. १४।२१ पथ्य–मीठ वर्ज्य.

## आम्लपित्त.

१ बाभळीच्या सालीचा अष्टमांश काढा ५ तोळे करून त्यांत तुरटीची पूड ४ गुंजा व साखर अर्धतोळा घालून प्यावें. दि. ३ दोहीं वेळां.

## उदर.

१ **जलोदरास**—कीकरजातीच्या बाभळीची साल व त्रिफळा घेऊन अष्टमांश काढा उरल्यावर पुनः आटवून घट्ट करून ताकांतून पिऊन वर ताकच पिऊन राहिल्यास जलोदर लवकर जातो. दि. ५।७।१४.

## उपदंश.

१ **गर्मी लागून वद होतें त्यास**—सापाच्या कातेस बाभळीचा डिंक लावून वर पट्टी बसवावी. दि. ३.

२ **गर्मीच्या चट्ट्यास**—बाभळीच्या पानांचें किंवा फुलांचें चूर्ण बसवावें.

३ **शिश्नास चट्टे पडल्यास**—बाभळीच्या सुक्या पानांचें चूर्ण किंवा सालीचें चूर्ण वस्त्रगाळ करून बसवावें किंवा चिकणी सुपारी उगाळून लेप द्यावा.

## कर्णरोग.

**१ कान वाहातो त्यास**—बाभळीच्या झाडाच्या सालींचा काढा करून मंदोष्ण असा कानांत घालून पुसून नंतर कानांत तुरटीची लाही करून पाण्यांत घालून तें पाणी कानांत घालून वर कापूस बसवावा. दि. ३।७.

**२ कानानें ऐकूं येत नाहीं त्यास**—बाभळीची साल, आलें, मध, सैंधव, तिळाचें तेल यांचा अर्क काढून कानांत घालावा. दि. ७।१४; ऐकूं येतें.

## कुष्ट.

१ क्षयरोगांत सांगितलेलें बब्बुलासव १ महिना घेतल्यास सर्व कुष्टांचा नाश होतो.

## घर्मरोग.

**१ घाम जाणेस**—बाभळीचीं पानें व हिरडेदळ पाण्यांत वांटून अंगास लेप करून थोडया वेळानें वाळल्यावर स्नान करावें म्हणजे घाम येणें बंद होतें व असें ७ किंवा १४ दि० केल्यास कायमचें घाम येणें बंद होतें. पण त्रिफळ्याचा काढा सकाळीं घ्यावा.

## तृषा.

१ बाभळीचा डिंक व खडीसाखरेचा खडा तोंडांत धरल्यास तहान जाते.

## दंतरोग.

१ बाभळीच्या शेंगेची पूड रोज सकाळीं दांत घासण्यास फार उत्तम आहे; अथवा बाभळीचा १० बोटे लांबीचा ओल्या काष्टाचा कुंचा करून त्यानेंही सकाळीं दांत घासल्यास स्वच्छ व बळकट होतात.

२ **दांतांतून रक्त आल्यास**—बाभळीचीं पानें वांटून दांतांत धरावीं.

३ **दांत बळकट होण्यास**—बाभूळ, बोर, जांभूळ, किंवा बकूळ ह्यांपैकीं कोणत्याही झाडाच्या अंतरसालीच्या रसानें किंवा काढयानें गुळण्या कराव्या. दांत बळकट होतात व किडत नाहींत.

## नेत्ररोग.

१ **डोळ्यांतून पाणी 'वाहतें त्यास**—बाभळीच्या पानांचा काढा $\frac{1}{8}$ करून त्यांत थोडा मध घालून रात्रीं निजतेवेळीं अंजन करावें.

२ **नेत्राभिष्पंदास ( डोळे येतात ) त्यास**—बाभळीचा व कडू-निंबाचा पाला वांटून त्याची वडी डोळ्यावर बांधून रात्रीं निजावें.

३ आकाकियाचें अंजन करावें. दि. ३. हें गंध्याच्या दुकानीं किंवा हकीमाजवळ मिळतें.

४ **डोळ्यांतील पू–चिकटा जाणेस**—बाभळीच्या अंतरसा-लीचा अर्क व मध यांचें अंजन करावें. फक्त रात्रीं दि. ३. नेत्रस्राव व पू–चिकटा बंद होतो.

## पांडुरोग.

१ मोठ्या किंवा १६ वर्षांच्या पुढील वयाच्या माणसास पांडुरोग झाल्यास बाभळीच्या सालीचा अष्टमांश काढा करून त्याचीं ७ पुटें तंबाकूस देऊन तिचा धूर तोंडांत घ्यावा. दि. २१ सकाळसंध्या-काळ.

२ **एक वर्षानंतरचें मुलांस**—बाभळीच्या शेंगा जाळून राख करून वयमानाप्रमाणें २ ते ५ गुंजाभार घेऊन मधांतून द्यावी. दि. ७ दोहीं वेळां.

## प्रमेह.

१ **परम्यास उपाय**—बाभळीचीं कोंवळीं पानें १।२ तोळे वांटून त्यांत १ तोळा खडीसाखर घालून खावें. दि. ७ सकाळ-संध्याकाळ.

२ **तिडक्या परम्यास व इतरही सर्वतऱ्हेच्या परम्यास**—बाभळी व कडूलिंबाच्या अंतरसाली ५।५ तोळे समभाग घेऊन सर्व दगडी खलबत्त्यांत रात्रीं कुटून बुडेल इतक्या पाण्यांत २० तोळे सुमारें कांचेच्या भांड्यांत भिजत ठेवून सकाळीं कुसकरून ५।६ तोळेपर्यंत घेऊन त्यांत १ तोळा खडीसाखर घालून प्यावें. बाकीचें दुपारीं व रात्रीं प्यावें. दि. ५।७ परमा व गरमी हटकून जाते.

## परमा.

३ **हट्टी परम्यास**—( कोणताही परमा न गेल्यास ) करडीचें तेल ३ तोळे घेऊन त्यांत बाभळीच्या डिंकाचें चूर्ण $\frac{1}{2}$ तोळा घालून प्यावें. दि. ७ सकाळसंध्याकाळ.

४ **साध्या परम्यास**—बाभळीचीं फुलें पाव तोळा, तिळाचें तेल ३ तोळे, कागदी लिंबाचा रस १ तोळा घालून घ्यावें. दि. ३।७ सकाळसंध्याकाळ हटकून गुण.

५ **मधुमेहास उत्तम**—बाभळीची साल, जांभळीची साल, कडूनिंबाची साल, तरवडाची साल, हिरडा, बेहडा, आवळकाठी यांचा काढानिकाढा ५।५ तोळे घ्यावा. दि. ७।१४।२१.

६ **मधुमेहास**—बाभळीचीं कोंवळीं पानें व डाळिंबाचीं कोंवळीं पानें १।१ तोळा घेऊन-वांटून खावी. दि. १४।२१. मधुमेह जातोच पण दांत हालत असल्यास बळकट होतात.

७ **कसल्याही परम्यास**—बाभळीची अंतरसाल, कडूनिंबाची

अंतरसाल, गुळवेल प्रत्येकीं ४।४ तोळे घेऊन ठेंचून रात्रीं २० तोळे पाण्यांत भिजत घालून सकाळीं कुसकरून गाळून त्यांत १ तोळा खडीसाखर घालून प्यावें. दि. ७।१४ हटकून गुण.

८ **तंतुमेहास**—त्रिफळा, बाभळी, कडूनिंब, आंबा ह्यांच्या अंतरसाली २।२ तोळे कुटून अष्टमांश काढा करून ५ तोळे उरल्यावर गाळून घेऊन निवाल्यावर १ तोळा तूप घालून प्यावा. दि. ७।१४ उत्तम गुण येतो. हा मधुमेहासही चांगला आहे.

९ **रक्तप्रमेहास**—देवबाभळीचा पाला ४ तोळे कुटून त्यांत जिऱ्याचें चूर्ण अर्ध तोळा घालून व साखर १ तोळा घालून ताकांतून प्यावें. दि. ३.

१० परम्यावर पिचकारी देणें झाल्यास बाभळीच्या अंतरसालीच्या काढ्याची द्यावी.

## बालरोग.

**१ बालाच्या गुदभ्रंशास (अंग बाहेर येणें.)**—बाभळीच्या सालीच्या दाट काढ्यांत कपडा भिजवून घडी ठेवून वर लंगोटी घालावी.

**२ मुलें हिरवट हगत असल्यास**—बाभळीच्या पानांचा रस वयाप्रमाणें १-२ बोंडलीं द्यावा. दि. ३ सकाळसंध्याकाळ.

३ बाभळीच्या शेंगा धायटीचीं फुलें समभाग घेऊन त्यांचा काढा करून त्यांत मुलास तासभर बसवावा म्हणजे हटकून अंग बाहेर येणें बंद होतें.

४ कडूनिंब व बाभळीचा पाला ताकांत वांटून घामोळ्यास अंगास लावून वाळल्यावर स्नान घालावें.

## मुखरोग.

**१ तोंड येतें व तोंडांत चट्टे पडतात त्यांस**—बाभळीची

अंतरसाल पाण्यांत किंवा दुधावरल्या साईत उगाळून दिवसांतून ३।४ वेळ लावावें. किंवा साल कुटून रात्रीं पाण्यांत भिजत घालून सकाळीं गाळून त्या पाण्याच्या गुळण्या कराव्या. दि. ३।५.

२ मुखरोगास—बाभळीची व जांभळीची अंतरसाल यांचा काढा करून त्याच्यांत तुरटीच्या लाहीची पूड घालून त्याच्या गुळण्या कराव्या. दि. ३।४ हें मुखरोगास उत्तम आहे.

३ बाभळीच्या अंतरसालीच्या काढयानें गुळण्या केल्यास मुखरोग, दांत हलणें, घशांतील शिथिलपणा हीं जातात.

४ मुखांतील कोरड व घशांतील कोरडा खोकला डिंकाचा खडा तोंडांत धरल्यास जातो.

५ **पडजीभ उतरल्यास**--डिंक व दालचिनी यांच्या चूर्णाचें पाणी तयार करून गुळण्या वरचेवर कराव्या.

६ गरमीचें औषध किंवा तोंड येणारें किंवा चट्टेपडणारें दुसरें औषध घेतल्यानें किंवा चुन्यानें चट्टे पडल्यास बाभळीच्या काढयाच्या गुळण्या कराव्या. दि. ३।५ रोज ३ वेळ.

७ **मुखरोग दंतरोग न होणेस**--बाभुळ, बोर, बकूळ यांच्या झाडाच्या अंतरसालीच्या काढयानें गुळण्या कराव्या.

## मूत्ररोग.

१ **मूत्रकृच्छ्रास—मूत गुंतल्यास**—डिंक पावतोळा पातळ करून ( थंड पाण्यांत ) १ तोळा तूप घालून पाजावें. दि. ३.

२ **लघवीची आग होत असल्यास**--बाभळीचीं पानें व जिरें वांटून दूध व साखर घालून प्यावें. सकाळसंध्याकाळ दि. ३.

३ बाभळीचा डिंक १ भाग, साखर ३ भाग, पाणी १० भाग मिश्र करून डिंक विरघळल्यावर प्यावें. दि. ३

**४ शिश्नाच्या आंतील नळीचें तोंडीं किंवा आंत चट्टे पडल्यामुळें लघवीच्या वेळीं आग होते किंवा झोंबतें त्यास—**

बाभळीच्या व कडूनिंबाच्या अंतरसालीचा काढा करून तो निवाल्यावर पिचकारीनें शिस्नाच्या आंत घालावा; आंतील चट्टे जाऊन लघ्वी साफ होते. दि. ७।१४.

## रक्तपित्त.

१ बाभळीच्या झाडाच्या सालीचा काडानिकाढा घेतल्यास रक्तपित्त जातें. दि. ७।१०.

२ पाव तोळा बाभळीच्या डिंकाची पूड १० तोळे पाण्यांत विरघळल्यावर त्यांत १ तोळा साखर व २ गुंजाभार तुरटीच्या लाहीची पुड घालून मिसळून प्यावें. दि. ३ सकाळसंध्याकाळ पथ्य–मीठ, तेल, तिखट व आंबट वर्ज्य.

## वातरोग.

१ देवबाभळीच्या शेंगा व रानबावच्या ह्यांचें चूर्ण अर्ध तोळा समान घेऊन गाय किंवा शेळीच्या दुधांतून सकाळसंध्याकाळ १।१ तोळा घेतल्यास १ महिन्यांत कंपवात जाऊन शरीरही पुष्ट होतें.

**अस्थिसंधिगतवात, स्नायु, मज्जा, कंबर यांतील वायु, गृध्रसी, मन्यास्तंभ, हनुस्तंभ, कोष्ठवात या सर्वांस आभाचूर्ण–** बाभळीचें बीं, रास्ना, गुळवेल, शतावरी, महाशतावरी, सुंठ, बडीशेप, आस्कंद, शेरणी, वरधारा, ओवा, अजमोदा हीं सर्व औषधें समभाग घेऊन चूर्ण करून एकत्र मिश्र करून दरवेळीं १ तोळा घेऊन यूष, ताक, ऊन पाणी, तूप, यांपैकीं एकाबरोबर चूर्ण घ्यावें. दि. ३०।४० दोहींवेळां.

## विरेचन ( ढाळक ).

१ बाभळीच्या शेंगांचा चतुर्थांश काढा करून त्यांत हिरड्याचें चूर्ण किंवा कायफळाचें चूर्ण पावतोळा घालून प्यावें, व वर विडे खावें. जितके विडे खावें. तितकेच ढाळ होतात. उतार—दहींभात ऊन पाणी.

## विष.

**१ पिसाळलेलें कुत्रें चावल्यास किंवा कोल्ह्याच्या विषावर उपाय**—देवबाभळीचें ताजें मूळ २।४ तोळे घेऊन पाण्यांत उगाळून पाजावें. पथ्य—मीठ वर्ज्य; अळणी दूध, जोंधळ्याची भाकर खावी.

२ **कुत्र्याच्या विषास**—पिसाळलेलें कुत्रें चावून विष चढल्यास—देवबाभळीच्या पाल्याच्या ३ तोळे रसांत तूप २ तोळे घालून पाजावें, सकाळसंध्याकाळ. दि. ३ उत्तम आहे.

३ ओला देवबाभळीचा पाला न मिळाल्यास वाळलेला पाला १ तोळा घेऊन तिळाचें तेल १ तोळा व साखर १। तोळा घेऊन चारावें. पथ्य—तूप, जोंधळ्याची भाकरी खावी. मीठ वर्ज्य. मेघगर्जना, वीज चमकतें किंवा नुसतें ढग येणें अशावेळीं दिवसांतून ३ वेळां वरील कोणतेंही औषध देत जावें. कारण कुत्र्याचें विष चढण्यास तो काळ फार अनुकूल असतो.

**४ बाभळीच्या पाल्याचा रस वय पाहून १ पासून ५ तोळे काढून गाईच्या १ तोळा तुपांतून द्यावा. दि. ७** पथ्य—अळणी वरण, तूप, भाकरी.

## शूळ.

१ **पोटदुखीस**—बाभळीच्या अंतरसालीच्या काढ्यांत ओव्याचें चूर्ण व सुंठ घालून द्यावें.

## सूज.

१ बाभळीचें बीं गोमूत्रांत वांटून लेप केल्यास सूज उतरतें.

२ चुना १ तोळा, गूळ २ तोळे, बाभळीच्या कोंवळ्या ढिम्या २ तोळे, सर्व वांटून २८ गोळ्या करून १४ दिवस सकाळसंध्याकाळ खाव्या. सूज जाते.

## स्त्रीरोग.

१ **प्रदरास**—बाभळीचा कोंवळा पाला पाण्यांत वांटून रस ४ तोळे काढून त्यांत तूपसाखर १।१ तोळा घालून द्यावें. सकाळसंध्याकाळ. दि. ३।५.

२ **प्रदरास**—बाभळीच्या ढिम्या किंवा सालीचा अर्क ४ तोळे घेऊन त्यांत १ तोळा साखर व ४ तोळे दूध घालून घ्यावा. आणि तूपभात, किंवा दूधभाताचें पथ्य करावें. रोज सकाळीं दि. ७।१४ चांगलें आहे.

३ बाळंतिणीनें प्रथम १० दिवस बाभळीच्या अंतरसालीच्या चतुर्थांश काढ्यानें गुळण्या कराव्या. म्हणजे दांत बळकट होऊन तोंडांतील चट्टे जातात.

४ दररोज बाळंतिणीस १० दिवस तूपसाखरेंतून १ तोळा डिंक कंबर बळकट होणें करितां देतात, हें चांगलें आहे.

## क्षय.

१ **बब्बुल्यासव**—१२ शेर बाभळीच्या सालीचें चूर्ण १२८ शेर पाण्यांत शिजवून ३ शेर पाणी उरलें म्हणजे गाळून थंड झालेवर त्यांत गूळ १८।।। शेर धायटीच्या फुलाचें चूर्ण १ शेर १० तोळे पिंपळीचें चूर्ण व जायपत्री, लवंग, कंकोळ, वेलादाणे, दालचिनी, तालिसपत्र, नागकेशर व मिरें ह्या प्रत्येकाचें ५।५ तोळे चूर्ण मिसळून मडक्यांत घालून तोंड बंद

करून १ महिना पुरून ठेऊन, काढून १ पासून ३ तोळे वयमानाप्रमाणें व सोसेल तसें १ वेळ सकाळीं घेतल्यास क्षय, कुष्ट, प्रमेह, खोकला व श्वास ह्यांचा नाश होतो. दि. ३०।४० दोहीं वेळां.

**बब्बुल्यादिअरिष्ट**—बाभळीची अंतरसाल १ शेर घेऊन साधारण कुटून ८० तोळे पाणी घालून चौथाई काढा उरल्यावर गाळून थंड झाल्यावर गुळ ३० तोळे, धायटीचीं फुलें ६ तोळे, पिंपळी १ तोळा, व जायफळ, कंकोळ, वेळादाणे, दालचिनी, तमालपत्र, लवंगा, मिरीं हीं प्रत्येकीं अर्ध अर्ध तोळा घेऊन सर्व चूर्ण करून, सर्व काढ्यांत एकत्र करून बरणींत घालून झांकण घालून मुखमुद्रा करून जमिनींत किंवा धान्यराशींत पुरून ठेवून १ महिन्यानें काढून दररोज सकाळसंध्याकाळ २। २ तोळे घेतलें असतां क्षय, कुष्ट अतिसार, २० प्रकारचे प्रमेह, खोकला व श्वास हे जातात. दि. ३०.

## क्षुद्ररोग.

१ **नारूवर**—बाभळीचें बीं गोमूत्रांत वांटून लेप करावा दि. ३.

२ **वाट सरकल्यास**—बाभळीचा व नांदरुखीचा कोंवळा पाला बारीक वांटून दह्यांत कालवून खाऊन उताणें १ तास निजावें.

३ **केरोसिन (राकेल) पोटांत गेल्यास**—बाभळीच्या डिंकाचें अर्धवाटी पाणी मधाइतकें दाट करून १ चमचा तूप घालून पाजावें.

४ **जखम होऊन रक्त वाहूं लागल्यास**—संतबाभळीपासून तयार केलेली अकाकिया दुकानांत मिळते त्याची पूड जखमेंत भरल्यास रक्त वाहणें बंद होतें.

५ **अग्निदग्धव्रणास**—कोंबड्याची अंड्याच्या सफेतींत अकाकिया खलून लेप करावा.

**६ अंग भाजल्यास किंवा पोळल्यास**—डिंकाचें दाट पाणी करून लावावें; आग कमी होऊन फोड उठत नाहीं.

## पौष्टिक योग.

**१ धातुपुष्टतेस**—बाभळीच्या शेंगांचा अष्टमांश काढा २।३ तोळे करून गाळून, दुधांत घालून त्यांत साखर घालून प्यावा. यानें धातु पुष्ट होऊन शरीरही बळकट व पुष्ट होतें.

**२ वीर्यस्तंभनास**—खुरट्या बाभळीच्या सालीचा किंवा पाल्याचा रस वांटून काढून ५ तोळे प्यावा. दि. ३।५।७ सकाळीं १ वेळ.

**३ शरीरपुष्टीस, कंपवातास, बुद्धि, स्मृति, मेधावृद्धि, वलिपलित यांस**—कीकरजातीच्या बाभळीच्या शेंगा व रानबावच्या समान घेऊन चूर्ण करून, गाय किंवा शेळीच्या दुधांतून १ तोळा घ्यावें. रोडका मनुष्यहि पुष्ट होतो व कफवात, शोषरोग ही जातो. व मनुष्य बुद्धिमान, स्मृतिमान्, मेधावी होतो व त्याचा वलिपलित रोग जातो. दि. २० दोहीं वेळां.

४ डिंक बाभळीचा व कथल्यागोंद, गव्हाची पिठी, हीं प्रत्येकीं समभाग, साखर ३ भाग मिसळून दुधांतून दरवेळीं ३ तोळेपर्यंत घ्यावें. उत्तम पौष्टिक असून वीर्यस्तंभक व शक्तिदायक आहे.

५ बाभळीचा डिंक व चारोळ्या ४।४ तोळे, आळीव व खसखस, खारीक, तीळ, शेपा, बाळंतशेपा, बिंब्यांतील गोडंब्या, बदामगर हीं सर्व ४।४ तोळे घेऊम त्यांत मेथ्या २ तोळे गूळ व तूप घालून लाडू २।२ तोळ्याचे करून, सकाळीं १।१ घेऊन खावा. म्हणजे धातुस्तंभन, धातुवृद्धि होऊन कटिवात जाऊन कंबरेस चांगली शक्ति येते. दि. १५।३० हें बाळंतिणीनें अगत्य खावें.

६ **धातुपौष्टिक योग**—बाभळीचा डिंक -॥- शेर, पिठीसाखर -॥- बदामगर -॥- इसबगोल -।- बीजबंद १ तोळा, तालिमखाना ६ तो. दालचिनी १ तोळा, सालमिश्री १ तो. सफेत मुसळी १ तो. पंजाबमिश्री १ तो. उडदाच्या डाळीचें पीठ ४ तो. खारीक सोलून १ शेर सर्वांचें चूर्ण करून बरणींत ठेवून दररोज सकाळीं तूप २ तो. चूर्ण २ तोळे मिळून खावें. वर सोसेल तसें गाईचें दूध प्यावें. दि. १४।२१.

७ **वीर्यस्तंभनास**—बाभळीच्या अंतरसालीचा अर्क शक्तिप्रमाणें १।२ तोळे घेऊन त्यांत २।३ गुंजाभार सैंधव घालून प्यावें. अथवा अष्टमांश काढा ५ तोळे घेऊन त्यांत सैंधव ४ गुंजाभार, साखर -॥; तोळा घालून घ्यावा. दि. ३।७ व कारणपरत्वें.

समाप्त.

# बिल्वमहत्त्व.

ज्याप्रमाणें तुलसीप्रताप ३७ रोगांवर ११० औषधें व निंब-प्रभाव पुस्तकांत ५३ रोगांवर २७९ औषधें लिहिलीं आहेत त्याचप्रमाणें ह्या बिल्वमहत्त्व पुस्तकांत ही हटकून गुण देणारीं ४६ रोगांवर १८६ औषधें लिहिलीं आहेत. पुस्तकही त्याच साचाचें जाड कागदावर जाड टाइपानें छापलें आहे. त्यांत बेलाच्या झाडाचें, बिल्वदलाचे अनेक धार्मिक व औषधी उपयोग सांगितले आहेत. तसेंच फळाचे, झाडाच्या सालीचे, मुळाचे औषधी व व्यापारीही उपयोग सांगितले आहेत. आणि हे फुकट व सहज होणेसारखे आहेत. करितां प्रत्येक गांवीं कुटुंबवत्सलांनीं व सर्वसाधारण लिहितां वाचतां येणाऱ्या स्त्री-पुरुषांनीं अगत्य याचा उपयोग करून घ्यावा. हें पुस्तक शैव व लिंगायत शिवभक्तांस फारच आवडलें आहे. सदरहू पुस्तकाची किंमत ३ आणे व पोस्टखर्च अर्धा आणा एकूण ३॥ आण्याचीं तिकिटें पाठवावींत. पुस्तकाबद्दल अभिप्राय ता. ५।८।३२ च्या केसरींत पहा.

REFBK-0004775

वा. क्र. ४७७५